विभागीयशिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७
वेबसाईट www.dydepune.com
ई-मेल आयडी क्र. dydpune@gmail.com.

---

जाक्र/शिउस/पुवि/प्राथ/माध्य/उमा/२०१६/1837

दिनांक : १०.०६.२०१६

14 JUN 2016

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक)
सर्व जिल्हा परिषद,
जि. पुणे, अहमदनगर, सोलापूर

**विषय :** सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांमध्ये शाळा पूर्वतयारी व शाळा प्रवेशोत्सव साजरा करणेबाबत.

संदर्भ : मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे दि. २९.०५.२०१६चे पत्र.

वरील संदर्भीय विषयानूसार आपल्या अधिनस्त शाळा व महाविदयालयांच्या प्राचार्य/मुख्याध्यापकांनी दि. १५ जून, २०१६ पूर्वी शाळा, वर्गखोल्या, स्वच्छतागृह, शाळा, महाविदयालय परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत आपल्यास्तरावरुन आदेश देण्यात यावेत.

शाळेच्या पहिल्या दिवशी प्रसन्न वातावरणात विदयार्थ्यांचे स्वागत करावे.

तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेकडे संकलित करणेबाबत कळवावे.

MRaut 10.6.16
(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे

विभागीयशिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७
ई-मेल आयडी क्र. dydpune@gmail.com. वेबसाईट www.dydepune.com

---

जाक्र/शिउस/पुवि/उमा/२०१६/ 9837 दिनांक : १०.०६.२०१६

14 JUN 2016

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालय, (सर्व)
पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय :** सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांमध्ये शाळा पूर्वतयारी व शाळा प्रवेशोत्सव साजरा करणेबाबत.
संदर्भ : मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे दि. २९.०५.२०१६चे पत्र.

वरील संदर्भीय विषयानूसार दि.१५जून,२०१६पूर्वी आपल्या शाळा, महाविदयालयातील सर्व परिसराची स्वच्छता करावी.

सर्व वर्गखोल्या, वर्गातील बाके, कपाटे, फरशी, स्वच्छतागृह, जिने, पाण्याच्या टाक्या धुवून, पुसून स्वच्छ कराव्यात, आवश्यकतेनूसार फिनेलचा वापर करावा.

शाळेत वर्गानूसार शैक्षणिक साहित्य लावून ठेवावे, उदा. तक्ते, रंगचित्रे, बोलक्या भिंती इत्यादी.

शिक्षकांकडे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक नोंदवहया, उपस्थितीपत्रक, कॅटलॉग तसेच मुख्याध्यापकांकडे संपूर्ण वर्षाचे नियोजन शालेय व इतर उपक्रमांसह तयार असावे. दि.१५जूनपूर्वी तयार असावे.

पूर्वतयारीसाठी आवश्यकतेनूसार शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना दि.१३,१४ जून,२०१६ रोजी शाळेत बोलवावे.

शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व विदयार्थी, पालक, व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांसाठी शालेय वातावरण स्वच्छ, प्रसन्न व अभ्यासपूरक असणेसाठी वरीलप्रमाणे पूर्वतयारी करुन पहिल्यादिवशी विदयार्थ्यांचे शाळा पातळीवर स्वागत करावे. याची सर्व जबाबदारी इ.१ली ते १२वी पर्यंतच्या शाळांच्या मुख्याध्यापकांची राहील, याची नोंद घ्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेकडे देण्यात यावा.

MRaut 10.6.16
(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे

**प्रत :**
**शिक्षणाधिकारी, (प्राथमिक, माध्यमिक)सर्व**
जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर, सोलापूर.